**महाराष्ट्र शासन**

क्रमांक- बीआयडब्ल्यू २०११/३६०/प्र.क्र.१८८/ल-४,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक - १३ /०७/२०१२

प्रति,

विभागीय आयुक्त,नाशिक
जिल्हाधिकारी, नाशिक

विषय- इनाम/वतन जमिनीच्या नजराणा रकमेबाबत .

संदर्भ:- १) आपले पत्र क्रमांक भूसुधार-१/कावि/३०९३५/२०११/३२८९९ दि. ०८/०७/२०११

२) शासन पत्र समक्रमांक दि. २८/०७/२०११

३) शासन पत्र समक्रमांक दि. १७/०८/२०११

महोदय,

उपरोक्त विषयावरील आपल्या संदर्भ क्रमांक १) येथील पत्राच्या अनुषंगाने संदर्भ क्रमांक २) च्या पत्रान्वये निर्गमित स्पष्टीकरणास संदर्भ क्रमांक ३) च्या पत्रान्वये स्थगिती देण्यात आली आहे.

२. आता, प्रस्तूत प्रकरणी मला आपणास असे कळविण्याचे आदेश आहेत की, संदर्भ क्रमांक २) च्या पत्रास संदर्भ क्रमांक ३) च्या पत्रान्वये देण्यात आलेली स्थगिती उठविण्यात येत असून विविध भूसुधार कायद्यांखाली खालसा करून नवीन शर्तीने पुनर्दानित (Regrant) केलेल्या इनाम/ वतन जमिनींच्या बाबतीत एकदा **विहीत नजराणा** रक्कम भरून भोगवटादार वर्ग-१ करण्यास परवानगी दिल्यानंतर भविष्यात जमीन धारकाने बीनशेती करण्यासाठी परवानगी मागितल्यास परवानगीच्या दिवशी असलेल्या बाजारमुल्यानुसार नजराणा रक्कम निश्चित करुन त्यामधून पूर्वी भरलेल्या नजराण्याची रक्कम वजा करुन येणा-या फरकाची रक्कम आकारता येणार नाही असे अर्धन्यायीक निर्णय तसेच प्रशासकीय स्पष्टीकरण यापूर्वी वेळोवेळी कळविण्यात आले आहे. त्यानुसार आपल्या संदर्भीय पत्रान्वये पुन्हा नजराणा आकरण्याबाबत व्यक्त केलेली धारणा योग्य नाही.

आपला,

(शिवाजी गोरे)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग